डॉ. व्ही. एन. शिंदे

# एक पत्र करोनास...



प्रिय (?)कोरोनास,

सुरुवातीलाच स्पष्ट करतो, पत्राची सुरुवात 'प्रिय' लिहून कंसात दोन चिन्हे का लिहिली ते. पत्र वाचकांच्या मनातील भावनादर्शक ही दोन चिन्हे. 'प्रिय' लिहिलेले पाहून ज्यांना आश्चर्य वाटेल, त्यांच्यासाठी उद्गारवाचक चिन्ह. तर तुला मी 'प्रिय' कसा म्हणू शकतो, हा प्रश्न पडणारांसाठी प्रश्नचिन्ह. तसा मी वेडा आहे, म्हणूनच तुला पत्र लिहतोय. 'न केलेल्या पापाचे माप' माझ्या पदरात टाकणारांचाही ऋणी राहतो. त्यांच्या कृतीने काहीतरी चांगले शिकवलेले असल्याने त्यांचा तिरस्कार करत नाही. असा माणूस आमच्या दुनियेत वेडाच. तू तर इतके शिकवलेस की तुझा तिरस्कार करणे कसे शक्य आहे? म्हणूनच 'प्रिय' म्हटले.

कोरोना, तू आल्यानंतर सारे जग बदलले. सर्वजण घरात कोंडले. यंत्रांचा खडखडाट, विमानांची घरघर, कारखाने, रेल्वे, गाड्या सारे थांबले. नद्यांना प्रदूषित करणारी कारखान्यांची पाइपलाइन कोरडी झाली. तू दिसत नाहीस, तरीही तुला घाबरतो. घरात कोंडून घेतल्यामुळे जिवितहानीचे अपेक्षेएवढे नुकसान केले नाहीस, तरी मोठे आर्थिक नुकसान केलेस. गेलेले जीवही कमी नाहीत. पण दरवर्षी रस्ते अपघातात साडेतेरा लाख लोकांचे प्राण जायचे. मात्र तुझ्या भीतीने वाहने लॉक केली आणि अपघातात जाणारे जीव वाचले. तू घेतलेल्या जीवांनी जणू त्याची भरपाई केली. पण तरीही झालेले नुकसान कमी, याचा आनंद मानायचा; की तु घरात कोंडून टाकलेस, अनेकांचे जीव घेतलेस, त्याचे दुःख? काहीच कळत नाही.



वेळोवेळी सावध करायला तुझे अनेक भाऊबंद आले. त्यांनी आम्हाला सतावले. अनेकांचे जीव घेतले. देवी, इबोला, एन्फ्ल्यूएंझा, कांजिण्या, टॉयफॉइड, डेंग्यू, कॉलरा, पोलिओ, प्लेग, कुष्ठरोग, क्षय असे अनेक. प्रत्येकावर आम्ही मात केली. 'आम्ही सर्वश्रेष्ठ' असा गर्व बाळगला आणि तू पुन्हा पुन्हा रूप बदलून आलास... आताप्रमाणे...





तू भयंकर विनाश करणार, हे ओळखून क्वारंटाइन झालो. आम्ही निसर्गाचे गुन्हेगार म्हणून तोंड झाकून घेतले, असे तुला वाटते. खरंय ते. पण आमच्यातील अनेकांना निसर्गाशी केलेल्या क्रूर वर्तनाची लाज वाटत नाही. त्यांनी तुझ्या भीतीने तोंड झाकलेय. आमच्या गरजा त्या काय? शुद्ध हवा, पाणी, चांगले अन्न आणि उन, वारा, पावसापासून वाचण्यासाठी निवारा. मात्र आम्ही प्राणीधर्म विसरून गरजेपेक्षा मोठी घरे बांधली. त्यासाठी वृक्षतोड केली. आमच्या संस्कृतीच्या विकासास मदत करणाऱ्या गंगेपासून पंचगंगेपर्यंत सर्व नद्या मृत्यूदायिन्या बनवल्या. तेलाचे, खनिजांचे अमर्याद साठे उपसले. हवेचे प्रदूषण केले. परिणामी, सूर्याच्या अतिनील किरणांपासून आम्हाला वाचवणाऱ्या ओझोनच्या थराला धोका निर्माण केला.

शेती, सिमेंटची जंगले, कारखाने उभारण्यासाठी जंगलांची कत्तल केली. झाडांनी दिलेल्या ऑक्सिजनशिवाय जगू शकत नाही. झाडे पावसाची 'एटीएम' यंत्रे. झाडामुळे जमिनीची धूप कमी होते. हे ठावूक असूनही झाडे तोडली. झाडेच नसतील, तर ऑक्सिजन कोठून येणार? याचा विचार आम्ही आजही करत नाही. हे आमचे चुकतंय. कळतंय, पण वळत नाही. समुद्राचे किनारे, तलाव, जंगल... जे जे सुंदर आहे, ते उपभोगणे आमचा हक्क मानतो. पण ते सुंदर ठेवण्याची जबाबदारी नाकारतो. 'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे' ही विंदांची शिकवण. आम्ही शब्दशः घेतली. देणाऱ्या निसर्गाचे हात ओरबाडून घेतले. दानशूरपणाचा गुण घेतलाच नाही.

आमचे शरीर शाकाहारासाठी बनलेले. पण आम्ही दुधदुभत्यासाठी पाळलेल्या मेंढ्यांना मांसासाठी मारले. कोंबड्यांची अंडी पुनरूत्पादनासाठी नव्हे, तर जिभेचे चोचले पुरवण्यासाठी वापरली. कुत्र्या-मांजरापासून वटवाघळापर्यंत सर्व प्राणी खाल्ले. वाघ बसायला व्याघ्रासन हवे म्हणून मारले. 'आम्हीच सर्वश्रेष्ठ' असा गर्व झाला आम्हाला. पण तू आलास आणि वाघाला न घाबरणारे आम्ही, तू न दिसताही तुला घाबरून घरात बसलो आणि...

गर्दीने फुललेली ठिकाणे ओस पडली. मोकळे रस्ते भयाण झाले. गाड्यांचा, हॉर्नचा आवाज नाही. सर्वत्र स्मशान शांतता पसरली. आकाशात चंद्र, चांदण्या आहेत, मंद वारा आहे, फुललेल्या रातराणीचा गंध आहे, पण सारे निःशब्द. मनाला अस्वस्थ करणारी शांतता. निःशब्द शांततेत आनंद घ्यायची आम्हाला सवय नाही. आम्ही ज्यांना त्रास दिला, ते पक्षी मुक्तपणे वावरताहेत, गाताहेत. जंगलातील प्राणी सिमेंटच्या जंगलात येत आहेत. त्यांना आमची भिती वाटत नाही. निसर्ग खूप सुंदर बनला आहे. मात्र त्याचा आनंद घ्यायला बाहेर आल्यास तू हल्ला करशील या भीतीने बाहेर पडता येत नाही. त्यामुळे पक्षी, प्राणी आम्हाला वाकुल्या दाखवतात, असे वाटतेय. जीवाची घालमेल होतेय. तू खूप नुकसान केलेस, असे म्हणणार नाही. उलट आम्ही केलेल्या पर्यावरणाच्या हानीची जाणीव झाली. लोकांना हे म्हणणे वेडेपणाचे वाटेल. आम्ही सर्व गोष्टी पैशात मोजतो. निसर्गाचा विचार करणे आम्ही कधीच सोडून दिलंय. तू अनेकांचे जीव घेतलेस, तरीही स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिलेस.

इटलीच्या प्रसिद्ध लेखिका फ्रांसिस्का मेलँड्रींनी 'फ्रॉम युअर फ्युचर' हे सावध करणारे पत्र लिहिले. मात्र खरेच बदलणार आहोत का आम्ही? हा प्रश्न माझ्याही मनात आहे. तरीही खूप झाले रे... आता संपव हे सगळं. मला खात्री आहे, तुला संपवणारी लसही आम्ही शोधून काढू. मात्र तोपर्यंत तुझा प्रकोप लांबवू नकोस. निसर्गाच्या संवर्धनासाठी, आमच्या पुढच्या पिढीला स्वच्छ पाणी, शुद्ध हवा मिळण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. आम्ही जन्मलो, तेव्हा जग जितके सुंदर होते, त्यापेक्षा जास्त सुंदर बनवण्यासाठी प्रयत्न करू. आमच्या नातवंडाना, परतवंडांनाही आजी चिऊ-काऊचा घास भरवू शकेल, यासाठी सर्वांना जगण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध राहील, याची काळजी घेऊ. म्हणून स्वतःला आवर. आम्हाला घातलेले 'लॉक' आता 'डाऊन' कर. आणि तू जा... अगदी कायमचा!

पुढारी

# शहरात १ हजार ८७८ व्यक्ती क्वारंटाईन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर शहरात १ हजार ८७८ व्यक्तींना क्वारंटाईन करण्यात आले आहे. यात महापालिकेच्या २१ अलगीकरण कक्षांत १ हजार २३३ जणांना ठेवण्यात आले आहे. होम क्वारंटाईन ६४५ नागरिक आहेत.

महापालिकेच्या शेंडापार्क येथील आरोग्यप्रशिक्षण केंद्रातील अलगीकरण कक्षात ४४, खासगी हॉटेल (१३ ठिकाणी) ३१४, अंडी उबवणी केंद्र येथे १०, पंजाबराव देशमुख वसतिगृह ८९, गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निक ४ व राजाराम कॉलेज ४३, अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह ८२, आयसोलेशन हॉस्पिटल ८, कृषी विद्यापीठ वसतिगृह ४२, शिवाजी विद्यापीठ २६९, शिवाजी विद्यापीठ मुलांचे वसतिगृह ६०, न्यू कॉलेज वसतिगृह १२७, सैनिकी मुलींचे वसतिगृह ३३, विवेकानंद कॉलेज १२, कमला कॉलेज ५३, डी. बी. पाटील वसतिगृह ९, माई तेंडुलकर वसतिगृह ९, जैन बोर्डिंग ११, लिंगायत वसतिगृहात १३ नागरिकांना अलगीकरण कक्षामध्ये ठेवण्यात आलेले आहे.